ATOMIC ENERGY CENTRAL SCHOOL NO. 2, MUMBAI

Unit Test- PERIODIC TEST – 2 (2023 – 24) Date: M.M: 40

Class 7th Marathi 3rd language Time: 1Hr

Marathi- Sulabhbharati (L- 8,9,10,11)

---

प्रश्न:-1.खालील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे लिहा. 4

पाऊस पाडणा-या आभाळाची आम्ही बाळे आहोत. पिके देणारी ही काळी माती आमची आई आहे. आभाळ आमचा पिता व धरती आमची माता आहे. आम्ही निसर्गाची बाळे आहोत. याशिवाय आमची जात वेगळी नाही. याशिवाय आमचा धर्म निराळा नाही. आम्हा कष्टक-यांची वस्ती श्रमरूपी गंगेच्या काठावरती आहे. कष्ट आम्हाला गंगेसारखे पवित्र आहेत. आम्ही सर्व कष्टकरी आहोत. याशिवाय आम्हाला निराळे नाव नाही की वेगळे गाव नाही.

घाम गाळून, अतोनात कष्ट करून काम करायचे ही एकच निष्ठा आम्हाला माहीत आहे. कष्ट करणे आमचे इमान आहे. यापरते आम्हाला वेगळे कर्म नाही. याशिवाय आमचा वेगळा मार्ग नाही. आम्ही मानवतेचे अतूट नाते जपतो. आम्ही आमचे भाग्यविधाते आहोत. आम्हीच आमचा उद्धार करणार आहोत. यावेगळा आमचा संप्रदाय नाही. माणुसकी हाच आमचा पंथ आहे व संत आहे.

कोट्यवधी भारतीयांच्या मजबूत हातांनी नवसमाजनिर्मितीचा जगन्नाथाचा रथ आम्ही ओढून नेणार आहोत. यावेगळी आमची कोणतीही इच्छा नाही. यावेगळा आमचा कोणताही ध्यास नाही.

१) कष्टक-यांची वस्ती कोठे आहे?
२) लेखक स्वत:ला कोणाची बाळे म्हणवून घेतो?
३) कष्टक-यांचे इमान कोणते?
४) मानवतेचे नाते कसे आहे?
५) नवसमाज निर्मिती कोणामुळे शक्य होणार आहे?

प्रश्न:-2 खालील प्रश्नांसाठी योग्य उत्तराचा पर्याय निवडा (कोणतेही आठ) 4

1. रमाबाईंची कन्या मनोरमा परदेशातून..... लिपी शिकल्याने अंधांना त्याचा फायदा झाला. (मोडी /रोमन /ब्रेल)
2. लेकीला ........ भाषा कळते. (निसर्गाची /पाकळीची /रात्रीची)
3. 'आपण सर्वांना मदत केली पाहिजे. या मदतीची सुरुवात .................. करा.'
   (शाळेपासून /घरापासून /सरकारकडून)
4. घरात राहणारे- (हळवे स्वर /मुले /पक्षी)
5. अवतीभवती झिरपणारे- (पाणी /झरे /गाणे)
6. सोनालीने काय करावे असे आईला वाटत होते?
   (मोबाईलवर खेळ /शाळेचा अभ्यास /अवांतर वाचन)

7. पंडिता रमाबाईंचा विवाह.....बरोबर झाला (बिपिनबिहारी मेधावी /आनंद मोहन /अनुप उजागरे)
8. खेळताना सोबत करणारे- (पूर्णविराम /विरामचिन्हे /अर्धविराम)
9. पंडिता रमाबाईंनी........मिशनची स्थापना केली. ( शक्ती /भक्ती /मुक्ती)
10. घरात एकोप्याने खेळणारे - (मांजर /कुत्रा /काना, मात्रा, वेलांटी)
11. सोनालीला प्रोत्साहन देण्यासाठी तिच्या बाबांनी काय केले?
    (पुस्तक दिले /खाऊ दिला /सायकल दिली)
12. कवितेतील लेक केव्हा रूसून बसते? (हसल्यावर / रागावल्यावर /बोलल्यावर)

प्रश्न:-3. तीन ते चार वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन). 4

1. आईने सोनालीला कथेचा सारांश लिहायला का सांगितला?
2. पंडिता रमाबाईंनी स्त्रियांसाठी सुरू केलेले चार उद्योग लिहा.
3. फुलांसारखे ........, सुरात मिसळूनी ......चला रे ......गाती तेच शहाणे, बाकी सारे ......!
   (कवितेच्या ओळी पूर्ण करा)
4. तुमच्या घरात आई नसेल तर तुम्हाला काय वाटेल? ते थोडक्यात लिहा.

प्रश्न:- 4. पुढील व्याकरणावर आधारीत प्रश्न सूचनेनुसार सोडवा. (कोणतेही पाच) 5

1. दिलेल्या शब्दाचे पहिले अक्षर बदलून कंसात दिलेल्या अर्थाचा शब्द लिहा-
   उदा- पुस्तक (डोके)- मस्तक; घागर (समुद्र)......, समता (माया)......
2. अभ्यास करा कारण चांगले गुण मिळतील.(उभयान्वयी अव्यय ओळखा)
3. गाडी सुरू होताच रमेशचे डोके सिटवर आपटले ( शब्दयोगी अव्यय ओळखा)
4. पूर्वी मुंबईत डिसेंबर महिन्यात खूप थंडी असायची (क्रियाविशेषण अव्यय ओळखा)
5. छान! किती सूरेल बासरी वाजवलीस!(केवलप्रयोगी अव्यय ओळखा)
6. तिने अतुलला खेळणी दिली. (सर्वनाम ओळखा)
7. अर्थपूर्ण शब्द बनवा- सफुधस, कानीनोका
8. समानार्थी शब्द लिहा- विजय, पारितोषिक
9. चांद्रयान चंद्रावर पोहोचले. (क्रियापद ओळखा)

प्रश्न:- 5. मित्राला वाढदिवसाचे निमंत्रण देणारे पत्र लिहा किंवा 3
“माझा मित्र” या विषयावर १० ओळी लिहा